


# वर्ष ६० वे

स्थापना : १९६१ दूरध्वनी : ७२०८८३६०९०

बेस्ट

# बेस्ट
# कला आणि क्रीडा मंडळ


बहुमजली इमारत, ७ वा मजला, बेस्ट,
कुलाबा, मुंबई - ४०० ००१
Email ID : bestartsandsportsclub@gmail.com


३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा

# वार्षिक अहवाल

२०२०-२०२१

# बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ

## बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ

प्रस्तावना : मंडळाच्या घटनेतील जोडपत्र नियम क्र.५ नुसार, वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ३१ जुलै पर्यंत आयोजित करणे अनिवार्य असते. परंतु, कोविड - १९ या वैश्विक महामारीची पार्श्वभूमी लक्षात घेता, सदर सभा आयोजित करणे शक्य झाले नाही.

### -: सूचना :-

'६०वी सर्वसाधारण सभा' आयोजित करण्याबाबत मंडळाचे अध्यक्ष – महाव्यवस्थापक यांची मान्यता घेण्यात आलेली आहे.

बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या सर्व सभासदांना अशी सूचना करण्यात येते की, **शुक्रवार,** दिनांक **२७.५.२०२२** रोजी सायंकाळी **५.३०** वाजता मंडळाची '६०वी वार्षिक सर्वसाधारण सभा', कॉन्फरन्स् हॉल, १ला मजला, बेस्ट भवन, कुलाबा, मुंबई-४०० ००१ येथे घेण्यात येणार आहे.

### * कार्यक्रम पत्रिका *

१. सभेची सूचना वाचून दाखविणे.
२. दिनांक २६ मार्च, २०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त संमत करणे.
३. दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल व लेखा विवरणपत्र स्वीकृत करणे व संमत करणे.
४. अध्यक्षांच्या परवानगीने इतर विषयांवर चर्चा करणे. यासाठी ७ दिवसांची लेखी सूचना खालील व्यक्तींकडे पाठविणे. सभेमध्ये जास्तीत जास्त ३ प्रश्नांची उत्तरे दिली जातील किंवा त्याआधी कार्यालयात उत्तरे दिली जातील.

| | |
|---|---|
| अ) क्रीडा विभाग | : श्री. प्रमोद यादव - सरचिटणीस (क्रीडा) |
| ब) कला विभाग | : श्री. विजय सूर्यवंशी - सरचिटणीस (कला) |
| क) बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ | : बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाचे कार्यालय, बहुमजली इमारत, ७वा मजला, कुलाबा, |

दिनांक : **१९.४.२०२२**

(प्रमोद यादव)
मा. सरचिटणीस (क्रीडा)

.................................................................................................................................

१. वार्षिक अहवालाची **ई** प्रत लेखा विवरणपत्रासह संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

२. वार्षिक अहवाल व लेखा विवरणपत्राबाबतच्या सर्व दुरुस्त्या, सूचना व प्रश्न लेखी स्वरुपात श्री. प्रमोद यादव- सरचिटणीस (क्रीडा) व श्री. विजय सूर्यवंशी - सरचिटणीस (कला) यांच्याकडे दिनांक **२०.५.२०२२** पर्यंत देणे अनिवार्य आहे.

३. जर पुरेशा गणसंख्येअभावी (३० सभासदांपेक्षा कमी उपस्थिती) ही सभा तहकूब झाली तर, सदर सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरेल.

# बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ

## -: वार्षिक अहवाल २०२०-२१ :-

दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल लेखा विवरणपत्र आम्ही सादर करीत आहोत.

प्रस्तुत वर्षी दरमहा प्रती सदस्य रु.२०/- प्रमाणे एकूण वार्षिक वर्गणी रु. २४,३३,८१०/- मंडळाकडे उपलब्ध झाली. एकूण सभासद संख्या मार्च, २०२१ अखेर ९१४४ होती.

प्रत्यक्ष लेखाचे विवरणपत्र व खर्चाचा तपशील पत्रक शेवटच्या दोन पृष्ठांवर दिला आहे.

अ) नियामक समिती

२०२०-२१ वर्षाकरिता नियामक समितीची रचना पुढीलप्रमाणे होती (माहे एप्रिल ते मार्च) :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | मा. अध्यक्ष – महाव्यवस्थापक | : | डॉ. सुरेंद्रकुमार बागडे | - (दि.१२.०४.२०२१ पर्यंत) |
| | | : | श्री. लोकेश चंद्र | - (दि.०३.०६.२०२१ पासून) |
| २. | मा. उपाध्यक्ष - सहा. महाव्यवस्थापक (वि.पु.) | : | श्री. महेंद्र उरुणकर | |
| ३. | मा. सभापती (कला) | : | डॉ. राजेंद्र पाटसुते | - (दि.२०.०३.२०२० पासून) |
| ४. | मा. सभापती (क्रीडा) | : | श्री. धनंजय पवार | |
| ५. | मा. सरचिटणीस (क्रीडा) | : | श्री. प्रमोद यादव | - (दि.२५.०१.२०२१ पासून) |
| ६. | मा. सरचिटणीस (कला) | : | श्री. विजय सूर्यवंशी | - (दि.२५.०१.२०२१ पासून) |
| ७. | मा. उप सरचिटणीस (क्रीडा) | : | श्री. सुदास सावंत | |
| ८. | मा. उप सरचिटणीस (कला) | : | श्रीमती संध्या पुरव | |
| ९. | मा. लेखा परीक्षक | : | श्री. गणेश बांबळे | |
| १०. | मा. खजिनदार | : | श्री. मनोज गडहिरे | |
| ११. | मा. निबंधक | : | श्री. लहू पवार | |
| १२. | मा. विधी सल्लागार | : | श्री. सुरेश भोसले | |

ब) २०२०-२१ वर्षाकरिता 'व्यवस्थापन समिती (कला)' ची रचना पुढीलप्रमाणे होती :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | सभापती (कला) | : | डॉ. राजेंद्र पाटसुते | |
| २. | मा. सरचिटणीस (कला) | : | श्री. विजय सूर्यवंशी | |
| ३. | मा. उप सरचिटणीस (कला) | : | श्रीमती संध्या पुरव | |
| ४. | मा. लेखा परीक्षक | : | श्री. गणेश बाबंळे | |
| ५. | मा. खजिनदार | : | श्री. मनोज गडहिरे | |
| ६. | मा. निबंधक | : | श्री. लहू पवार | |
| ७. | मा. सचिव (नाटय) | : | श्री. भूषण मेहेर | |
| ८. | मा. सचिव (एकांकिका) | : | श्री. उदय हाटले | |
| ९. | मा. सचिव (ललितकला व प्रदर्शन) | : | श्रीमती भारती कांबळी | |
| १०. | मा. सचिव (विविध करमणूक) | : | श्री. संजय चौधरी | |
| ११. | मा. सचिव (संगीत व साहित्य) | : | श्री. शेखर कवळे | |
| १२. | नामनिर्देशित सदस्य | : | श्री. अभय चव्हाण | |
| १३. | स्वीकृत सदस्य (कला) | : | श्री.संदिप खराडे | - (दि.१०.०३.२०२१ पासून) |

क) २०२०-२१ वर्षाकरिता 'व्यवस्थापन समिती (क्रीडा)' ची रचना पुढीलप्रमाणे होती :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सभापती (क्रीडा) | : | श्री. धनंजय पवार |
| २. | मा. सरचिटणीस (क्रीडा) | : | श्री. प्रमोद यादव |
| ३. | मा. उप सरचिटणीस (क्रीडा) | : | श्री. सुदास सावंत |
| ४. | मा. लेखा परीक्षक | : | श्री. गणेश बाबंळे |
| ५. | मा. खजिनदार | : | श्री. मनोज गडहिरे |
| ६. | मा. निबंधक | : | श्री. लहू पवार |
| ७. | मानद् सचिव (मैदानी खेळ) | : | रिक्त आहे |
| ८. | मानद् सचिव (बॅडमिंटन) | : | श्री. हेमंत आरोलकर |
| ९. | मानद् सचिव (क्रिकेट) | : | श्री. मंगेश साटम |
| १०. | मानद् सचिव (फुटबॉल) | : | श्री. अभय घरत |
| ११. | मानद् सचिव (हॉकी) | : | श्री. प्रशांत खानविलकर |
| १२. | मानद् सचिव (बैठे खेळ) | : | श्री. रुपेश पाडावे |
| १३. | मानद् सचिव (कबड्डी) | : | श्री. संजय मोरे |
| १४. | मानद् सचिव (टेबल टेनिस) | : | श्री. विभेश देसाई |
| १५. | मानद् सचिव (व्हॉलीबॉल) | : | श्री. श्रीकांत वेदांते |
| १६. | स्वीकृत सदस्य (क्रीडा) | : | श्री. विनोद मगर - (दि.१४.०६.२०२१ पासून) |

ड) मनोरंजन पर्यवेक्षक : श्री. अशोक सांगळे

शुक्रवार, दिनांक २६ मार्च, २०२१ रोजी झालेल्या ५९व्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाची ५९वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक २६ मार्च, २०२१ रोजी सायंकाळी ५.३० वाजता, कॉन्फरन्स् हॉल, पहिला मजला, बेस्ट भवन, कुलाबा आगार, मुंबई – ४०० ००१ येथे घेण्यात आली. त्यावेळी एकूण २६ सभासद उपस्थित होते.

सदर सर्वसाधारण सभेस डॉ. राजेंद्र पाटसुते - सभापती (कला), श्री. धनंजय पवार - सभापती (क्रीडा) तसेच मंडळाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. सभेचे अध्यक्षपद भूषविण्याकरिता श्री. प्रमोद यादव - सरचिटणीस (क्रीडा) यांनी डॉ. राजेंद्र पाटसुते - सभापती (कला) यांना विनंती केली. श्री. विजय सूर्यवंशी - सरचिटणीस (कला) यांनी अनुमोदन दिले. सभापती (कला) यांनी अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर श्री. धनंजय पवार - सभापती (क्रीडा) यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. सभेच्या प्रारंभी बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाने सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे लेखा विवरणपत्र व ताळेबंद पत्रक सभासदांच्या स्वीकृतीकरिता ठेवण्यात आले असता, उपस्थित सभासदांनी त्याला हात उंचावून सहमती दर्शविली. सन २०१९-२० चे वार्षिक लेखा विवरणपत्र व ताळेबंद पत्रक मंजूर झाल्याचे अध्यक्षांनी घोषित केले.

उपरोक्त वार्षिक सर्वसाधारण सभेस उद्देशून, सभचे अध्यक्ष - सभापती (कला), डॉ. राजेंद्र पाटसुते यांनी बोलताना, आपल्या महाविद्यालय काळातील आठवणी जागवून, व्यायामाने केवळ शारीरिक आरोग्यक्षमता नव्हे तर अभ्यासाकरिता मनाची एकाग्रता देखील वाढते. याचा प्रत्यय स्वानुभवातून मिळाला आहे असे सांगितले. व्यायाम हा लहानांपासून वयोवृध्दांपर्यंत सर्वांनी करणे आवश्यक आहे. यामुळे आपल्या कामातील एकाग्रता व क्षमता निश्चितच वाढणार आहे. परिणामी उपक्रमाच्या कामातील क्षमता देखील वाढणार आहे. तसेच ते पुढे म्हणाले की, बेस्ट उपक्रमाचे कर्मचारी / अधिकारी यांना मंडळाच्या माध्यमातून कला व क्रीडा गुणांना वाव देण्याकरिता व्यासपीठ (Platform) उपलब्ध करुन दिले आहे. याकरिता अंर्तमनातून योगदान देण्याची नितांत आवश्यकता आहे. नवीन कलाकृती निर्माण करण्याची क्षमता आपल्यात आहे आणि त्यामधूनच उपाय (solution) आपणास मिळत असतात. नवीन गोष्ट घडविण्यामध्ये प्रत्येकाने योगदान दिल्यानंतरच ती गोष्ट पूर्ण होणार आहे. त्यामुळे प्रत्येकाचे योगदान सार्थकी लागणार आहे. अशा प्रकारेच या बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाची वाटचाल आपल्या सर्वांना पुढे न्यायची आहे. कलाकार आणि खेळाडू यांना नवनवीन प्रयोग आत्मसात करण्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्यात.

सन २०१९-२० मध्ये मंडळाच्या कला व क्रीडा विभागाने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचे विवेचन अनुक्रमे, सरचिटणीस (कला) व सरचिटणीस (क्रीडा) यांनी केले.

सभेच्या अखेर सरचिटणीस (क्रीडा) यांनी बेस्ट समिती, बेस्ट व्यवस्थापन, सर्व उपस्थित मान्यवर, मंडळाला नेहमी सहकार्य करणारे स्थापत्य, कल्याण, सुरक्षा व दक्षता विभाग यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले व उपस्थित सर्व सभासदांना चहापानासाठी विनंती केली.

## -: कला विभाग :-

## नाटय विभाग

१. <u>५९वी महाराष्ट्र राज्य हौशी हिंदी नाटय स्पर्धा – २०१९-२० :-</u>

५९वी महाराष्ट्र राज्य हौशी हिंदी नाटय स्पर्धा अंतिम फेरीत श्री. गणेश मिंडे दिग्दर्शित व श्री. उदय दरेकर लिखित हिंदी नाटक 'अलगुजा' या नाटकाची रंगीत तालिम (कर्मचारीय प्रयोगाप्रमाणे) सकाळी ८.०० ते संध्याकाळी ७.०० वाजेपर्यंत दामोदर हॉल, परळ येथे सोमवार, दिनांक ०४.०१.२०२१ रोजी सादर झाली व स्पर्धा प्रयोग गुरुवार, दिनांक ०७.०१.२०२१ रोजी संध्याकाळी ७.०० वाजता रविंद्र नाटयगृह, प्रभादेवी येथे सादर झाला. सर्व कलाकारांनी उत्तमरित्या काम केले व सर्व तंत्रज्ञांनी ती आपापली कामगिरी चोख बजावली.

आपला देश प्रगत होत चालला आहे, तसेच समाजही प्रगतीशील होत आहे. तरीसुद्‌धा अजून काही ठिकाणी विचित्र पध्दतीच्या जुन्या रुढी परंपरा सांभळल्या जातात. महिलांना त्यांचे अधिकार वापरता येत नाही. त्यांच्या देहाचा व्यापार केला जातो. या देहविक्रीच्या व्यवसायाला प्रामुख्याने घरातूनच मान्यता मिळते, हे लेखकाने प्रखरपणे मांडले आहे. पण अशा संस्कृतीमध्ये सुध्दा लहानपणीच प्रेमाचा अंकुर रुजलेल्या व्यक्ती त्यात बदल घडवू इच्छितो परंतु त्या समाजाच्या विरोधापुढे त्यांचे काहीच चालत नाही. अशाप्रकारे प्रेम व विचित्र समाज यांची सांगड घालण्याचा प्रयत्न लेखक श्री. उदय दरेकर व दिग्दर्शक श्री. गणेश मिंडे यांनी केलेला आहे.

या नाटकाचा मुहूर्त रविवार, दिनांक ०३.०१.२०२१ रोजी कै. रमेश रणदिवे कलादालनात, आणिक आगारातील अधिकारी वर्गाच्या हस्ते करण्यात आला.

## एकांकिका विभाग

१. <u>मराठी / हिंदी लेखन स्पर्धा २०२०-२१:-</u>

बेस्ट उपक्रमाला नामवंत लेखकांची परंपरा आहे. उदा. श्री. ना. पेंडसे, सिध्दहस्त नाटककार प्र. ल. मयेकर या लेखकांनी 'बेस्ट'चे नाव साहित्य क्षेत्रात उज्ज्वल केले. त्या परंपरेला अनुसरुन, बेस्टमधील नवोदित लेखकांच्या लेखन कलेला वाव मिळावा म्हणून बेस्ट कला व क्रीडा मंडळाच्या एकांकिका विभागाच्या वतीने दिनांक २२.१२.२०२० ते २४.१२.२०२० या कालावधीत एकांकिका मराठी / हिंदी लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत चार नवोदित लेखकांनी आपला सहभाग नोंदवला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रख्यात लेखक, दिग्दर्शक श्री. संजीव कोलते यांनी काम पाहिले. स्पर्धेचा निकाल तयार करताना श्री. कोलते यांनी प्रत्येक एकांकिकेतील त्रुटी व जमेची बाजू यावर भाष्य केले व संबंधित लेखकांना तशा सूचना केल्या व स्पर्धेचा निकाल मानद् सचिवांकडे सुपूर्द केला.

| अनु. | क्रमांक | एकांकिका | लेखक / लेखिका |
|---|---|---|---|
| १. | प्रथम | मी-तू | योगेश शिंदे |
| २. | द्वितीय | सावल्यांच्या प्रदेशात | सुषमा पाठारे |
| ३. | तृतीय | प्लॅटोनिक लव्ह | राजू नाईक |
| ४. | उत्तेजनार्थ | चिंगी | प्रशांत धुमाळ |

२. <u>आंतर आगार एकपात्री अभिनय स्पर्धा २०२०-२१:-</u>

बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या एकांकिका विभागातर्फे शुक्रवार, दिनांक १५ जानेवारी, २०२१ रोजी कै. रमेश रणदिवे कलादालन, आणिक आगार येथे 'आंतरआगार एकपात्री अभिनय स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले. सदर स्पर्धेचे आयोजन कला क्षेत्रातील कलाकारांना प्रोत्साहित करण्यासाठी केले होते. या स्पर्धेत एकूण १३ कलाकारांनी आपली कला सादर केली. स्पर्धेचे उद्घाटन, श्री. श. शा. गोविलकर, प्रभारी कार्यकारी अभियंता - आणिक मोटरवाहन विभाग यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी श्री. खुडे - अधीक्षक परिवहन अभियांत्रिकी व श्री. म्हस्के, उपअभियंता - परिवहन अभियांत्रिकी, श्री. विजय राणे - सुरक्षा अधिकारी, श्रीमती संध्या पुरव - उप सरचिटणीस (कला) हे मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले व सहभागी कलाकारांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सुप्रसिध्द लेखक-दिग्दर्शक श्री. संजीव कोलते व सुप्रसिध्द अभिनेत्री धनश्री दळवी यांनी काम पाहिले. निकाल खालीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांक | श्री. दिनेश कानडे |
| द्वितीय क्रमांक | श्री. सचिन सावंत |
| तृतीय क्रमांक | श्री. चंद्रकांत जाधव |
| उत्तेजनार्थ | श्री. गणेश मिंडे |
| उत्तेजनार्थ | श्री. रजनीकांत दराडे |
| उत्तेजनार्थ | श्री. संविद नांदलस्कर |

संपूर्ण स्पर्धेचे सूत्रसंचालन (निवेदन) नामनिर्देशित सदस्य (कला) श्री. अभय चव्हाण यांनी केले. शेवटी निकाल वाचन व आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

३. संहिता / पटकथा लेखन कार्यशाळा :-

बेस्ट कला व क्रीडा मंडळाच्या एकांकिका विभागाच्या वतीने दिनांक २६ व २७ मार्च, २०२१ रोजी दोन दिवसीय संहिता / पटकथा लेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन सभापती (कला) सन्मानीय डॉ. श्री. राजेंद्र पाटसुते यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी कार्यशाळेचे प्रशिक्षक, प्रसिध्द लेखक / पटकथाकार सन्मानीय श्री. इब्राहिम अफगाण, बेस्टच्या माजी कर्मचारी लेखिका सुनिता तांबे, त्याचबरोबर सरचिटणीस (कला) श्री. विजय सूर्यवंशी व उप सरचिटणीस (कला) श्रीमती संध्या पुरव व मंडळाचे पदाधिकारी श्री. शेखर कवळे, श्री. संजय चौधरी, अभय चव्हाण तसेच बेस्टचे लेखक सर्वश्री उदय दरेकर (निवृत्त), माधव साने, रत्नदिप कांबळे, अर्जुन ढाकणे आदी मान्यवर उपस्थित होते. या लेखन कार्यशाळेत बेस्टच्या १७ लेखकांनी सहभाग घेतला. या प्रसंगी सभापती (कला) डॉ. राजेंद्र पाटसुते यांनी उपस्थितांना संबोधित केले. त्यांनी बेस्टच्या गतवैभवाची आठवण करुन दिली.

या कार्यशाळेच्या समारोप कार्यक्रमास सन्मानीय सभापती (क्रीडा) श्री. धनंजय पवार आवर्जुन उपस्थित होते. सोबत श्री. विजय सूर्यवंशी - सरचिटणीस (कला), मानद् सचिव (संगीत विभाग) श्री. शेखर कवळे व श्री. संजय चौधरी - मानद् सचिव (विविध करमणूक) उपस्थित होते. यावेळी श्री. धनंजय पवार - सभापती (क्रीडा) यांनी आपल्या खुमासदार भाषणाने उपस्थितांची मने जिंकली. या संपूर्ण कार्यक्रमाचे चित्रिकरण स्वीकृत सदस्य श्री. संदिप खराडे यांनी केले तर फोटोंच्या रुपात आठवणी संग्रहित करण्याचे काम श्री. संजय डिके यांनी केले. स्वयंसेवक म्हणून श्री. दिलिप लिगम व श्री. अनिल चौगुले यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी या कार्यशाळेसाठी सहकार्य करणारे सर्व विभागांचे अधिकारी व कर्मचारी याचे मानद् सचिव श्री. उदय हाटले यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

श्री. इब्राहिम अफगाण यांनी कथा कशी जन्म घेते, जसं गणित सोडवताना काही सूत्र वापरावी लागतात. अगदी तसंच कथा / पटकथा लिहिताना काही सूत्र ढोबळ आराखडे यांची रचना करुन कथा जन्म घेते. लेखकाने लक्षात घ्यावयाच्या गोष्टी कोणत्या हे सारं योग्य पध्दतीने समजावून सांगितले.

## ललितकला व प्रदर्शन विभाग

१. रंगावली स्पर्धा २०२०-२१ :-

प्रतिवर्षानुसार बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या ललितकला व प्रदर्शन विभागातर्फे दसरा स्नेह संमेलनानिमित्त शुक्रवार, दिनांक २३ ऑक्टोबर, २०२० रोजी मंडळाच्या सभासदांसाठी उपक्रमाच्या सर्व आगार व विभागांमध्ये ‘रंगावली स्पर्धा आयोजित करण्यात आली. तसेच २०२० हे वर्ष ‘कोरोना’ या जागतिक पातळीवरील साथीच्या आजारामुळे मंडळाने पुरुष व महिला ‘अ’ गटाची रंगावली स्पर्धा कॉन्फरन्स् हॉल, कुलाबा व दादर येथे घेण्यात येणारी स्पर्धा बेस्ट उपक्रमाच्या सर्व आगार व विभागांमध्येच सादर करण्याचा निर्णय घेतला. एकूण १४ स्पर्धकांनी २०२० या वर्षाकरिता सहभाग घेतला.

महाव्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्रकुमार बागडे यांनी कलाकारांचे कौतुक केले. या स्पर्धेचे परिक्षण सर्वश्री धर्मपाल सुर्वे, जगदीश पेडणेकर आणि सुगंध पवार यांनी केले.

| ‘अ’ गट पुरुष - चित्ररांगोळी (सामायिक) | | | |
|---|---|---|---|
| बक्षिस | स्पर्धकाचे नाव (सर्वश्री / सर्व श्रीमती) | विभाग | आगार |
| प्रथम क्रमांक | विशाल चव्हाण | परि. अभि. | शिवाजी नगर |

| | | | |
|---|---|---|---|
| 'ब' गट पुरुषांसाठी चित्र रांगोळी (सामायिक) | | | |
| प्रथम क्रमांक | कैलास पवार | आर.एम्.चासीस | दादर कार्यशाळा |
| द्वितीय क्रमांक | रघुनाथ कोळंबेकर | आर.एम्.चासीस | दादर कार्यशाळा |
| तृतिय क्रमांक | तुकाराम महाडेश्वर | वाहतूक | वडाळा |
| उत्तेजनार्थ - १ | विनायक जोशी | आर.एम्.चासीस | दादर कार्यशाळा |
| उत्तेजनार्थ - २ | राजेंद्र बने | परि. अभि. | मुंबई सेंट्रल |
| उत्तेजनार्थ - ३ | राजेंद्र वाडेकर | वैद्यकीय | बॅकबे |
| 'ब' गट स्त्रियांसाठी ठिपक्यांची रांगोळी (सामायिक) | | | |
| प्रथम क्रमांक | मनिषा गुणागी | वाहतूक मुख्य कार्यालय | वडाळा |
| 'ब' गट महिला / पुरुष - संस्कारभारती रांगोळी (सामायिक) | | | |
| प्रथम क्रमांक | वसंत राणे | सामुग्री (व्य) | कुलाबा |
| द्वितीय क्रमांक | श्वेता परब | वाहतूक | मालवणी |
| तृतिय क्रमांक | अश्विनी म्हात्रे | सामुग्री (व्य) | दादर |
| उत्तेजनार्थ - १ | राजेश मुरुडकर | परि. अभि. | मागाठणे |
| उत्तेजनार्थ - २ | आनंद भोजने | परि. अभि. | मागाठणे |

२. वार्षिक रंगावली प्रदर्शन:

दरवर्षी सादर करण्यात येणारे रंगावली प्रदर्शन हे या वर्षी 'कोविड-१९' च्या संसर्गजन्य परिस्थितीमुळे न घेण्याचा निर्णय मंडळाने सन २०२० या वर्षाकरिता घेतला.

३. छायाचित्रण स्पर्धा:

जागतिक महामारी यामुळे या वर्षी एकत्र न जमता ऑनलाईन छायाचित्रण स्पर्धा दिनांक १९ मार्च, २०२१ रोजी घोषित करण्यात आली. यामध्ये स्पर्धकांना 'मुंबईकरांच्या सेवेतील बेस्ट' या विषयावर फोटो काढून मंडळाच्या ईमेल आयडीवर पाठविण्याचे आवाहन केले होते. त्यासाठी एकूण १५ स्पर्धकांनी आपले छायाचित्र मंडळाच्या ई-मेल आयडीवर पाठविले.

परीक्षकांनी खालीलप्रमाणे निकाल जाहीर केला.

| बक्षिस | स्पर्धकाचे नाव (सर्वश्री) | विभाग /आगार |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | संजय चौधरी | पाठकवाडी |
| द्वितीय क्रमांक | योगेश शिंदे | परि. अभि., गोरेगाव |
| तृतिय क्रमांक | प्रशांत इलग | कर्मचारीय, कुलाबा |
| उत्तेजनार्थ - १ | झहीर काझी | वडाळा |
| उत्तेजनार्थ - २ | गणेश शिंदे | ग्राहक सेवा 'बी' वार्ड, कुलाबा |
| उत्तेजनार्थ - ३ | भूषण भालेराव | नियोजन, वीजभवन |
| प्रशास्तीपत्रक | राजेश कुडाळकर | परि. अभि., दादर कार्यशाळा |
| प्रशास्तीपत्रक | वसंत राणे | सामुग्री, कुलाबा |
| प्रशास्तीपत्रक | सुधीरकुमार जाधव | ग्राहक सेवा 'डी' वार्ड, कुलाबा |

परीक्षक: १. श्री. राजेंद्र वाघमारे,
संयुक्त सचिव, फोटोग्राफी सोसायटी ऑफ इंडिया.
२. श्री. सुभाष जिरंगे, सदस्य, फोटोग्राफी सोसायटी ऑफ इंडिया.

४. पारितोषिक वितरण समारंभ – रंगावली व छायाचित्रण स्पर्धा २०२०-२१:

बुधवार, दिनांक ३१.०३.२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता रंगावली व छायाचित्रण स्पर्धा २०२०-२१ पारितोषिक वितरण समारंभ कॉन्फरन्स् हॉल, कुलाबा येथे बेस्ट समिती अध्यक्ष श्री. प्रविण शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. एकूण २३ पारितोषिके देण्यात आली. या प्रसंगी श्री. सुनिल गणाचार्य - बेस्ट समिती सदस्य, श्रीमती अपर्णा प्रभुणे - संयुक्त सचिव, डॉ. पाटसुते - सभापती (कला), श्री. धनंजय पवार – सभापती (क्रीडा), श्री. विजय सूर्यवंशी – सरचिटणीस (कला), श्रीमती संध्या पुरव - उप सरचिटणीस (कला) तसेच मंडळाचे इतर पदाधिकारी, कुलाबा येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थित होते.

हा कार्यक्रम संपन्न करण्यासाठी ज्या ज्या व्यक्तींनी हातभार लावला, त्यांचे आभार मानद् सचिव (ललितकला व प्रदर्शन) श्रीमती भारती कांबळी यांनी मानले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

## संगीत व साहित्य विभाग

१. सुगम संगीत, अभंग गायन व नृत्य स्पर्धा :

बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या कला विभागाच्या संगीत व साहित्य विभागातर्फे दि. २२.०१.२०२१ रोजी कै.रमेश रणदिवे कलादालनात सुगम संगीत, अभंग गायन व नृत्य स्पर्धेचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा सुप्रसिध्द संगीतकार आणि या कार्यक्रमाचे परीक्षक सन्माननीय श्रीमती रेशमा गिध व श्रीमती सुषमा गिध यांच्या शुभहस्ते केले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे सुरक्षा अधिकारी श्री. विजय राणे उपस्थित होते.

सदर स्पर्धा एकूण ३ टप्प्यात सादर करण्यात आली. प्रथम घेण्यात आलेल्या 'अभंग गायन' स्पर्धेत ६३ स्पर्धकांनी, त्यानंतर घेण्यात आलेल्या सुगम संगीत स्पर्धेत ५३ स्पर्धकांनी भाग घेतला. अंतिम टप्प्यात नृत्य स्पर्धेत एकल नृत्य सादर झाली. या स्पर्धेतील गायक कलाकारांना मंडळातील वादक कलाकार सर्वश्री. संतोष शेट्टी, शेखर कवळे, सुशिर नांदलस्कर, राजेंद्र नरवडे व सतिश इडेकर यांनी मोलाची साथ दिली. तसेच संपूर्ण कार्यक्रमात निवेदक सर्वश्री. उदय हाटले व विजय सूर्यवंशी यांनी उत्तम कामगिरी बजावली. या स्पर्धेला सुगम संगीत परीक्षक म्हणून सर्व श्रीमती रेशमा गिध व सुषमा गिध आणि नृत्य स्पर्धेला परीक्षक म्हणून श्रीमती धनश्री दळवी होत्या.

निकालपत्र - अभंग गायन स्पर्धा

| अनु. | क्रमांक | स्पर्धकाचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|---|
| १ | प्रथम | श्री. इंद्रजित पारकर | सन्मानचिन्ह , प्रशस्तीपत्र व रोख |
| २ | द्वितीय | श्री. योगेश पाटील | सन्मानचिन्ह , प्रशस्तीपत्र व रोख |
| ३ | तृतीय | श्री. रमेश देखणे | प्रशस्तीपत्र व रोख |

उत्तेजनार्थ -पारितोषिक

| | | | |
|---|---|---|---|
| १ | उत्तेजनार्थ | श्री. मिलिंद वायदंडे | प्रशस्तीपत्र व रोख |
| २ | उत्तेजनार्थ | श्रीमती नेहा धेंडे | प्रशस्तीपत्र व रोख |
| ३ | उत्तेजनार्थ | श्री. रणजित माळी | प्रशस्तीपत्र व रोख |
| ४ | उत्तेजनार्थ | श्रीमती माधुरी करंडे | प्रशस्तीपत्र |
| ५ | उत्तेजनार्थ | श्री. सुनिल सावंत | प्रशस्तीपत्र |

सुगम संगीत स्पर्धा

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रथम | श्री. विजय आयरे | सन्मानचिन्ह , प्रशस्तीपत्र व रोख |
| २ | द्वितीय | श्री. सुनिल सावंत | सन्मानचिन्ह , प्रशस्तीपत्र व रोख |
| ३ | तृतीय | श्री. सुशिल पाटील | प्रशस्तीपत्र व रोख |

उत्तेजनार्थ -पारितोषिक

| अनु. | क्रमांक | स्पर्धकाचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|---|
| १ | उत्तेजनार्थ | श्री. प्रविण पवार | प्रशस्तीपत्र व रोख |
| २ | उत्तेजनार्थ | श्री. प्रमोद कसालकर | प्रशस्तीपत्र व रोख |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | उत्तेजनार्थ | श्री. जीवन सोनवणे | प्रशस्तीपत्र व रोख |
| ४ | उत्तेजनार्थ | श्री. जितेंद्र रसाळ | प्रशस्तीपत्र |
| ५ | उत्तेजनार्थ | श्री. निजाम अली सय्यद | प्रशस्तीपत्र |
| ५ | उत्तेजनार्थ | श्री. मोहन पार्थसारथी | प्रशस्तीपत्र |

निकालपत्र - नृत्य स्पर्धा

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रथम | श्रीमती माधुरी करंडे | सन्मानचिन्ह , प्रशस्तीपत्र व रोख |
| २ | द्वितीय | श्री. तुषार वाघमारे | सन्मानचिन्ह , प्रशस्तीपत्र व रोख |
| ३ | उत्तेजनार्थ | श्रीमती ममता शेडगे | प्रशस्तीपत्र व रोख |
| ४ | उत्तेजनार्थ | श्री. अनिकेत खैरे | प्रशस्तीपत्र व रोख |

या कार्यक्रमास सर्वश्री. अविरत साळवी, विजय सूर्यवंशी, सुरेश अढळराव व संतोष दळवी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



## -: क्रीडा विभाग :-

### मैदानी खेळ

कोरोनाच्या संसर्गजन्य परिस्थितीमुळे, सन २०२०-२१ या 'वार्षिक मैदानी खेळ स्पर्धे' करिता अनेक प्रयत्न करुन देखिल मैदान उपलब्ध झाले नाही, या कारणास्तव स्पर्धा आयोजित करणे शक्य झाले नाही. परंतु, प्रतिवर्षानुसार संघ जाहीर करणे आवश्यक असते. सबब, सन २०१८-१९ मध्ये झालेल्या मैदानी खेळ स्पर्धेनुसार जाहीर करण्यात आलेला संघ सन २०२१-२२ या स्पर्धांकरिता कायम ठेवण्यात आलेला आहे.

२०२१-२२ या वर्षाकरिता बेस्ट मैदानी खेळ संघ पुढीलप्रमाणे–

| अनु. | महिला संघ (सर्वश्रीमती) | अनु. | पुरुष संघ (सर्वश्री) |
|---|---|---|---|
| १ | प्रतिक्षा शेलार | ७ | प्रकाश धस |
| २ | कल्पना भोसले | ८ | राजेश पवार |
| ३ | मनिषा गुणागी | ९ | दिगंबर भोसले |
| ४ | शीला शिरटावले | १० | उल्हास नाफे |
| ५ | निता कदम | ११ | नितीन कु-हाडे |
| ६ | भाग्यश्री पै. | १२ | अमोल म्हात्रे |
| | राखीव खेळाडू | | |
| १ | आरती हडकर | १ | अमरशील पवार (प्रशिक्षक) |
| २ | समाधान कोळी | २ | भूषण थोरात |
| ३ | विजय अहिरे | ३ | भावेश तामोरे |

## बॅडमिंटन विभाग



१. वार्षिक अंतर्गत बॅडमिंटन स्पर्धा २०२०-२१ :-

बॅडमिंटन विभागातर्फे वार्षिक अंतर्गत स्पर्धा दिनांक २२.०३.२०२१ ते २४.०३.२०२१ या कालावधीत कोविड-१९ च्या नियमावलीच्या आधीन राहून कामगार कल्याण भवन, प्रभादेवी येथे घेण्यात आली. सदर स्पर्धा पुरुष एकेरी व महिला एकेरी अशा दोन विभागात आयोजित केल्या होत्या.

स्पर्धेचा उद्‌घाटन सोहळा सोमवार, दिनांक २२.०३.२०२१ रोजी सन्माननीय श्री. चेतन पाटील, अधिक्षक (परिवहन अभियांत्रिकी), कुलाबा आगार यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. सदर प्रसंगी सर्वश्री. धनंजय पवार - सभापती (क्रीडा), प्रमोद यादव - सरचिटणीस (क्रीडा), सुदास सावंत - उप सरचिटणीस (क्रीडा), गिरिश चंदनकर - उप मुख्य अभियंता (मार्गप्रकाश), सुमंत सरमोकदम - माजी सभापती (क्रीडा), प्रशांत खानविलकर - मानद् सचिव (हॉकी), रुपेश पाडावे - मानद् सचिव (बैठे खेळ) तसेच अभय चव्हाण - स्वीकृत सदस्य (कला) यांची उपस्थिती लाभली. पाहुण्यांचे स्वागत मानद् सचिव (बॅडमिंटन) श्री. हेमंत आरोलकर यांनी केले.

श्री. सचिन भारती हे पुरुष एकेरी अजिंक्य पदाच्या 'जे. बी. डिसोझा चषकाचे' मानकरी ठरले तर महिला एकेरी अजिंक्यपदाचा 'जयमाला गोडबोले चषक' सौ. संगिता जाधव यांनी पटकाविला.

बुधवार, दिनांक २४.०३.२०२१ रोजी दुपारी २.०० वाजता कामगार कल्याणभवन, प्रभादेवी येथे श्री. विजय सखाराम कदम, उप मुख्य व्यवस्थापक (आं.ले.प.) यांच्या शुभहस्ते पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला. सदर प्रसंगी श्री. विजय आंदे, प्रशासकीय व्यवस्थापक (आं.ले.प.) तसेच कामगार कल्याण भवनाचे कामगार प्रतिनिधी श्री. श्रीधर पंडित यांची उपस्थिती लाभली.

वार्षिक अंतर्गत बॅडमिंटन स्पर्धा २०२०-२१चे पारितोषिक प्राप्त खेळाडू –

| अ. | स्पर्धाप्रकार | निकाल | खेळाडूंचेनाव |
|---|---|---|---|
| १ | पुरुष एकेरी | विजेता | श्री. सचिन भारती |
| | | उपविजेता | श्री. दिपक दमानिया |
| | | उपांत्य विजेते | श्री. हेमंत आरोलकर व श्री. सुनिल पवार |
| २ | महिला एकेरी | विजेती | सौ. सांगिता जाधव |
| | | उप विजेती | सौ. श्रावणी ढापरे |
| | | उपांत्य विजेत्या | श्रीमती विशाखा बोरकर व श्रीमती सायली परब |

वार्षिक अंतर्गत बॅडमिंटन स्पर्धेतून सन २०२०-२१ करिता बेस्ट बॅडमिंटन संघ निवड खालीलप्रमाणे :-

पुरुष संघ

| क्र. | नाव (सर्वश्री) | क्र. | नाव (सर्वश्री) | क्र. | नाव (सर्वश्री) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सचिन भारती | २ | दिपक दमानिया | ३ | सुनिल पवार |
| ४ | हेमंत आरोलकर | ५ | सुरेश जाधव | ६ | सुदास सावंत |
| ७ | राजेश पाडावे | ८ | गोपाळ मिरजकर | | |

महिला संघ

| क्र. | नाव (सर्वश्रीमती) | क्र. | नाव (सर्वश्रामती) | क्र. | नाव (सर्वश्रीमती) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सौ. संगिता जाधव | २ | सौ. श्रावणी ढापरे | ३ | श्रीमती विशाखा बोरकर |



## क्रिकेट विभाग

वार्षिक आंतर आगार क्रिकेट स्पर्धा २०२०-२१:-

दिनांक २२.०३.२०२१, २४.०३.२०२१ व २६.०३.२०२१ रोजी ग्रेटर मुंबई पोलिस जिमखाना व ईस्लाम जिमखाना, मरिन ड्राइव्ह येथे वार्षिक आंतर आगार क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सध्या मुंबई क्रिकेट असोशिएशनच्या बहुतेक स्पर्धा २०-२० मर्यादित षटकांच्या खेळविल्या जातात म्हणून वार्षिक आंतर आगार क्रिकेट स्पर्धा देखिल २०-२० षटकांची खेळविली गेली. या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा सन्माननीय श्री. गिरिश चंदनकर - उप मुख्य अभियंता (मार्गप्रकाश) यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. यावेळी श्री. धनंजय पवार - सभापती (क्रीडा), श्री. प्रमोद यादव - सरचिटणीस (क्रीडा) व इतर पदाधिकारी, मानद् सचिव, खेळाडू उपस्थित होते. स्पर्धेच्या दुस-या दिवशी श्री. विजय शिरसाठ - सहा. आगार व्यवस्थापक (कुलाबा) यांनी भेट देऊन नावलौकिकाचा मान स्वीकारुन, स्पर्धेतील दोन्ही संघाना शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेत एकूण ६७ उत्कृष्ठ खेळाडू निवडून त्यांचे 'अ', 'ब', 'क' व 'ड' असे ४ समतोल संघ बनविण्यात आले. अंतिम साखळी सामना, 'ब' संघ विरुध्द 'ड' संघ दरम्यान झाला. साखळी सामन्यांच्या गुणानुसार निकाल पुढीलप्रमाणे –

| क्र. | संघ | निकाल |
|---|---|---|
| १ | 'ड' संघ | विजेता |
| २ | 'ब' संघ | उपविजेता |

| क्र. | संघ | निकाल |
|---|---|---|
| १ | सर्वोत्कृष्ट फलंदाज | श्री. निलेश खरमाळे |
| २ | सर्वोत्कृष्ट गोलंदाज | श्री. एस्. एम्. रेड्डी |

सन २०२१-२२ चा संघ निवडण्यासाठी निवड समितीवर सर्वश्री प्रमोद यादव - सरचिटणीस (क्रीडा), मंगेश साटम – मानद् सचिव, प्रशांत खानविलकर – मानद् सचिव (हॉकी), अजमल बेग यांची नेमणूक करण्यात आली होती. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ दिनांक

२६ मार्च, २०२१ रोजी श्री. धनंजय पवार – सभापती (क्रीडा) यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या समारंभासाठी श्री. विनोद कोरगांवकर – बेस्टचे माजी खेळाडू हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी श्री. प्रमोद यादव – सरचिटणीस (क्रीडा) तसेच बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

या स्पर्धेत मुंबई क्रिकेट असोसिएशनचे श्री. विजय वाघमारे व श्री. सुर्या जोशी यांनी पंच म्हणून काम पाहिले.

२०२१-२२ या वर्षाकरीता निवड करण्यात आलेला बेस्टचा क्रिकेट संघ पुढीलप्रमाणे -

| क्र. | नाव (सर्वश्री) | क्र. | नाव (सर्वश्री) | क्र. | नाव (सर्वश्री) |
|---|---|---|---|---|---|
| १ | विनय सोपते (कर्णधार) | २ | ज्ञानेश्वर गर्जे | ३ | किरण खानविलकर |
| ४ | केतन धाटावकर | ५ | निलेश खरमाळे | ६ | विजय यादव |
| ७ | देवराज गायकवाड | ८ | सुरेश गडेकर | ९ | मंदार पाटील |
| १० | महेश नाईक | ११ | सुनिल राऊत | १२ | अशोक हक्के |
| १३ | प्रविण पेडणेकर | १४ | मदन गणेकर | १५ | संजय कदम |
| १६ | प्रमोद यादव | | | | |

| राखीव खेळाडू | | सपोर्ट स्टाफ | |
|---|---|---|---|
| १ | सर्वेश शेट्टी | १ | अजित राणे |
| २ | कुणाल मिसाळ | २ | नितीन कासवलेकर |
| ३ | जयदिप हाटले | ३ | रोहित मोहिते |
| ४ | योगेश तेंडूलकर | ४ | सचिन घरत |

संघातील खेळाडू १६+ राखीव ४ + सपोर्ट स्टाफ ४

निवड समिती : सर्वश्री : १) प्रमोद यादव (२) मंगेश साटम (३) प्रशांत खानविलकर (४) अजमेल बेग

या वर्षी बेस्ट क्रिकेट संघाने इनशुरन्स् चषक क्रिकेट स्पर्धेमध्ये अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीचा सामना ग्रेटर मुंबई पोलिस संघाबरोबर झाला. त्या सामन्यात पोलिस संघाने प्रथम फलंदाजी करीत निर्धारित २० षटकांमध्ये एकूण १७० धावा केल्या. बेस्ट संघाने त्या धावांचा पाठलाग करताना १३० धावा केल्यामुळे बेस्ट संघाला उप विजेत्या पदावर समाधान मानावे लागले.

## फुटबॉल



१. 'आंतर आगार फुटबॉल स्पर्धा' २०२०-२१ :-

प्रस्तुतवर्षी 'आंतर आगार फुटबॉल स्पर्धा' दिनांक २७.०३.२०२१, ३०.०३.२०२१ व ३१.०३.२०२१ रोजी कर्नाटक स्पोर्टस् असोसिएशन मैदान, चर्चगेट येथे आयोजित करण्यात आली होती.

दिनांक २७.०३.२०२१ रोजी श्री. धनंजय पवार - सभापती (क्रीडा) यांच्या शुभहस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. सदर प्रसंगी माननीय श्री. प्रमोद यादव - सरचिटणीस (क्रीडा) व श्री. प्रविण शेट्टी - वरिष्ठ वाहतूक अधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित होते. संघांची विभागणी खालीलप्रमाणे ४ गटात करण्यात आली. सामने साखळी पध्दतीने खेळविले गेले.

१) दादर संघ : दादर कार्यशाळा, वरळी, आणिक, प्रतिक्षा नगर, देवनार व शिवाजी नगर
२) कुलाबा संघ : कुलाबा, बॅकबे, मध्य मुंबई, कसारा, पाठकवाडी, मागाठणे, पोयसर व गोराई
३) वांद्रे संघ : वांद्रे, मरोळ, मजास, सांताक्रुझ, गोरेगाव, दिंडोशी, ओशिवरा, मालवणी व मालाड
४) वडाळा संघ : वडाळा, मुलूंड, घाटकोपर, कुर्ला, विक्रोळी, धारावी, काळाकिल्ला

| क्र. | संघ | तपशील | पारितोषिक |
|---|---|---|---|
| १ | कुलाबा | विजेता | कै. भालचंद्र मोरे चषक |
| २ | वडाळा | उपविजेता | कै. युसुफ शेख चषक |

| क्र. | नाव (सर्वश्री) | तपशील | पारितोषिक |
|---|---|---|---|
| १ | श्री. सचिन घरटे | आंतर आगार स्पर्धा २०२०-२१तील उत्कृष्ट कामगिरीबद्दल | कै. सुरेंद्र सावंत चषक |

विजेत्या संघास श्री. सुदास सावंत, उप सरचिटणीस (क्रीडा) यांच्या शुभहस्ते तर उपविजेत्या संघास श्री. अशोक सांगळे, मनोरंजन पर्यवेक्षक यांच्या शुभहस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

सन २०२१-२२ करिता बेस्ट फुटबॉल संघ खालीलप्रमाणे आहे –

| क्र. | नाव (सर्वश्री) | क्र. | नाव (सर्वश्री) | क्र. | नाव (सर्वश्री) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अभय घरत (मानद् सचिव) | २ | दिलीप शिंदे (गोलरक्षक) | ३ | सागर मेस्त्री (गोलरक्षक) |
| ४ | बिजी कुंजनचन | ५ | प्रमोद चिपकर | ६ | हर्षल पाटकर |
| ७ | सौरभ लोखंडे | ८ | सर्जन भोईर | ९ | प्रविण शेट्टी |
| १० | ट्रेव्हर न्युनिस | ११ | राजेश पाटील | १२ | जितेंद्र कोळी |
| १३ | दिगंबर भोसले | १४ | प्रफुल्ल भोईर | १५ | सचिन पाटणकर |
| १६ | तुषार कर्डक | १७ | पृथ्वीराज भिक्रू | १८ | सचिन घरटे |
| १९ | सूर्यकांत भोपी | २० | प्रकाश पाटील | | |

निवड समिती : (१) सर्वश्री नितेश मोंडे (२) धिरज मेहेर (३) गॉडफ्रे पटेल

सन २०२१-२२ करीता बेस्ट फुटबॉल संघाचे प्रशिक्षक म्हणून श्री. चौकेंद्र नार्वेकर यांची निवड करण्यात आली तसेच संघटक म्हणून श्री.अनिल मोहिते व श्री.सुरेश गोरिवले यांची निवड करण्यात आली.

बेस्ट फुटबॉल संघाचे प्रतिनिधित्व केलेले माजी खेळाडू श्री. डॉमनिक परेरा व श्री. दिवाकर पाटील यांना फुटबॉल संघास अनेक वर्षे योगदान दिल्याबद्दल शाल, श्रीफळ व मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

२. फुटबॉल पुढील वर्षीच्या २०२१-२२ या वर्षाकरिता बेस्ट फुटबॉल संघ मुंबई जिल्हा फुटबॉल असोसिएशन आयोजित करीत असलेल्या लिग सामन्यांमध्ये पहिल्या (कॉर्पोरेट) विभागात खेळणार आहे.

## हॉकी विभाग



१. वार्षिक आंतर आगार हॉकी स्पर्धा २०२०-२१:

मंगळवार, दिनांक २३.०३.२०२१ रोजी महिंद्रा स्टेडीयम, मुंबई हॉकी असोसिएशन, चर्चगेट येथे बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाचे हॉकी विभागाच्या आंतर आगार स्पर्धेचे उद्घाटन बेस्टचे माजी आगार व्यवस्थापनक व हॉकी संघाचे माजी खेळाडू श्री. अरविंद भोर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनास विविध विभागांचे मानद् सचिव, मनोरंजन पर्यवेक्षक तसेच माजी मानद् सचिव उपस्थित होते.

साखळी पध्दतीने खेळवल्या जाणा-या स्पर्धेत बेस्ट हॉकी संघातील खेळाडू व नवोदित खेळाडू मिळून तीन समान संघ पुढीलप्रमाणे करण्यात आले :-

१) वडाळा संघ २) दादर संघ ३) वांद्रे संघ

बुधवार, दिनांक २४.०३.२०२१ रोजी गुणांच्या सरासरीवर खेळवल्या गेलेल्या अंतिम सामान्यात वडाळा संघाने दादर संघाचा २ विरुध्द १ अशा गोल फरकाने सामना जिंकून को.रा.आ.शेट्टी चषक पटकावला.

बुधवार, दिनांक २४.०३.२०२१ रोजी पारितोषिक वितरण समारंभ प्रमुख पाहुणे श्री. सयाजी सांगळे - हंगामी वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं.) यांच्या हस्ते पार पडला. सभापती (क्रीडा) श्री. धनंजय पवार, उप मुख्य अभियंता मार्गप्रकाश यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. समारंभास सरचिटणीस (क्रीडा) श्री. प्रमोद यादव हे उपस्थित होते. तसेच विविध क्रीडा विभागाचे मानद् सचिवही उपस्थित होते. सर्व मान्यवरांचे मानद् सचिव (हॉकी) यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

स्पर्धेस पंचांची कामगिरी मुंबई हॉकी असोसिएशनचे पंच श्री. विजय पांचाळ, श्री. अमित सैनी व श्री. सुनिल सक्रे यांनी उत्कृष्ठरित्या पार पडली.

निवड समितीने स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून श्री. एकनाथ सणस यांची निवड केली.

सन २०२०-२१ या वर्षाकरिता बेस्ट हॉकी संघ पुढीलप्रमाणे संघ जाहीर केला गेला.

| क्र. | नाव (सर्वश्री) | क्र. | नाव (सर्वश्री) | क्र. | नाव (सर्वश्री) |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रशांत खानविलकर (मानद् सचिव)/खेळाडू | २. | शैलेंद्र सोनटक्के (कर्णधार) | ३. | सुनिल शिंदे |
| ४. | राजेश गावडे | ५. | एकनाथ सणस | ६. | दिनेश मांडेकर |
| ७. | प्रविण शेट्टी | ८. | रमेश कुरी | ९. | विन्सेंट फुटार्डो |
| १०. | विजय बैले | ११. | संजय औटी | १२. | सुर्यकांत भोपी (गोल किपर) |
| १३. | बिस्मिल्ला तडवी | १४. | आय. एफ्. सैय्यद | १५. | नितीन देशमाने |
| १६. | प्रशांत प्रभुळकर (गोल किपर) | १७. | उदय पेडणेकर | १८. | नेल्सन कॉर्डोझ |
| १९. | सचिन नाईक | २०. | देवेंद्र कांबळे | | |

सपोर्टस्टाफ


| | | | |
|---|---|---|---|
| १ | योगेश सेलुकर | २ | कमलेश पाटकर |
| ३ | सुरेश महेश्वराम (किटमॅन) | ४ | कुणाल मोहिते (किटमॅन) |

निवड समिती : सर्वश्री (१) अरविंद भोर, (२) मुकुंद गांधी, (३) धर्मा शेट्टी

सन २०२०-२१ करिता बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या हॉकी संघाच्या कर्णधारपदी श्री. शैलेंद्र सोनटक्के तसेच प्रशिक्षकपदी श्री. सुनिल शिंदे यांची निवड करण्यात आली.

बेस्ट हॉकी संघाचे माजी मानद् सचिव व उत्कृष्ठ खेळाडू अनुक्रमे श्री. सुनिल सक्रे १ एप्रिल, २०२१ रोजी व श्री. नरेंद्र पुरबिया १ जुलै, २०२१ रोजी उपक्रमाच्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त होणार आहेत. त्या दोघांच्या गेल्या अनेक वर्षांच्या हॉकी संघाला दिलेल्या योगदानाबद्दल प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

## बैठे खेळ विभाग

वार्षिक कॅरम व बुध्दीबळ स्पर्धा २०२०-२१:

वार्षिक कॅरम व बुध्दीबळ स्पर्धा दिनांक ०८.०३.२०२१ ते २६.०३.२०२१ या कालावधीत वडाळा आगार क्रीडा कक्ष येथे खेळविण्यात आली. या स्पर्धेतील कॅरम विभागात एकूण १३० खेळाडूंनी व बुध्दीबळ विभागात एकूण ५० खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ सोमवार, दिनांक ०८.०३.२०२१ रोजी सायंकाळी ४.३० वाजता उद्घाटक सन्माननीय श्री. विजय नाथा सोनवणे, उप मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी (व) यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या प्रसंगी सर्वश्री धनंजय पवार (सभापती-क्रीडा), प्रमोद यादव (सरचिटणीस-क्रीडा), विजय सूर्यवंशी (सरचिटणीस-कला), सुदास सावंत (उप सरचिटणीस-क्रीडा) तसेच विविध कला व क्रीडा विभागातील मानद् सचिव, अधिकारी व कर्मचारी वर्ग, आजी-माजी खेळाडू, बंधु-भगिनी व इतर मान्यवर मंडळी उपस्थित होते.

सदर कॅरम स्पर्धा दुपारी ३.०० वाजता, सायंकाळी ४.३० वाजा व ६.३० वाजता अशा तीन सत्रामध्ये व बुध्दीबळ स्पर्धा सायंकाळी ४.०० वाजता सलग ७ दिवस (रविवार व सुट्टयांचे दिवस वगळून) खेळविण्यात आली.

या कॅरम स्पर्धेसाठी प्रमुख पंच म्हणून सर्वश्री संजय बर्वे व दिलीप सांडगे आणि बुध्दीबळ स्पर्धेसाठी श्री. नितीन पेडणेकर व श्री. सुदेश वायफळकर यांनी काम पाहिले.

या स्पर्धेसाठी स्पर्धा समिती पुढीलप्रमाणे होती.
श्री. धनंजय पवार (सभापती – क्रीडा), श्री. संजय बर्वे (माजी मानद् सचिव - बैठे खेळ), श्री. संतोष चव्हाण (विभागीय अभियंता) श्री. निलेश परब (माजी मानद् सचिव - बैठे खेळ), श्री. अशोक खरात, श्री. दिलीप सांडगे (माजी मानद् सचिव - बैठे खेळ), श्री. नितीन पेडणेकर, श्री. हितेन पटेल, श्री. सुदेश वायफळकर आणि श्री. रुपेश पाडावे (मानद् सचिव - बैठे खेळ)

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ गुरुवार, दिनांक २५.०३.२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजता प्रमुख पाहुणे सन्माननिय श्री. नागसेन एटांबे (आंतरराष्ट्रीय कॅरम खेळाडू, शिवछत्रपती पुरस्कार विजेता), श्री. अशोक जवकर, उप मुख्य अभियंता यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या प्रसंगी श्री. विजय कदम (हं. उप मुख्य व्यवस्थापक-आ.ले.प.), श्री. धनंजय पवार, सभापती – क्रीडा, श्री. प्रमोद यादव, सरचिटणीस-क्रीडा, श्री. सुदास सावंत - उप सरचिटणीस (क्रीडा) तसेच विविध कला व क्रीडा विभागातील पदाधिकारी, मानद् सचिव, अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच क्रीडा रसिक उपस्थित होते.

या प्रसंगी श्री. अशोक जवकर यांना त्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

या दोन्ही समारंभाचे सूत्र संचालन श्री. सुरेश साळुंखे व संजय बर्वे यांनी केले. सर्व पाहुण्यांचे तसेच कला व क्रीडा विभागातील सर्व पदाधिका-यांचे व इतर मान्यवरांचे मानद् सचिव (बैठे खेळ), श्री. रुपेश पाडावे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व कार्यक्रम सुरळीतपणे संपन्न झाल्यानंतर सर्वांचे आभार मानले.

## कबड्डी विभाग



१. <u>आंतर आगार कबड्डी स्पर्धा २०२१-२२ :-</u>

वार्षिक आंतर आगार कबड्डी स्पर्धा दिनांक २३.०३.२०२१ ते २७.०३.२०२१ या कालावधीत बेस्ट कर्मचारी वसाहत परेल येथील मैदानावर आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत एकूण १६ संघानी भाग घेतला.

दिनांक २३.०३.२०२१ रोजी सन्मानिय श्री. अनिल कोकिळ, मा. बेस्ट अध्यक्ष, आ. नगरसेवक तसेच श्री. अनंत मराठे, आगार व्यवस्थापक, प्रतिक्षानगर यांच्या शुभहस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी श्री. धनंजय पवार, सभापती (क्रीडा), श्री. प्रमोद यादव (सरचिटणीस-क्रीडा), श्री. सुदास सावंत – उप सरचिटणीस (क्रीडा), बेस्ट ॲलॉटिज असोसिएशन, परेलचे अध्यक्ष श्री. अमृत रावराणे उपस्थित होते. उद्घाटन सामने धारावी आगार विरुध्द प्रतिक्षानगर आगार या संघांमध्ये झाला.

दिनांक २७.०३.२०२१ रोजी स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे श्री. बाळकृष्ण डामसे, सहाय्यक वाहतूक अधिकारी - वडाळा, श्री. रंजन चौधरी - माजी बेस्ट समिती सदस्य, श्री. धनंजय पवार - सभापती (क्रीडा), श्री. प्रमोद यादव - सरचिटणीस (क्रीडा) यांच्या शुभहस्ते 'विजेता' बॅकबे आगार संघास कै. इंदिरा शेट्टये चषक, मंडळाचा चषक आणि रोख पारितोषिक व प्रशस्तीपत्रके तर उपविजेता वडाळा आगार संघास 'शरद आचार्य फिरता चषक', रोख रक्कम व प्रशस्तीपत्रके देण्यात आली. 'तिस-या' क्रमांकासाठी कुलाबा आगार संघाला मंडळाचा फिरता चषक तर स्पर्धेतील 'शिस्तबध्द' संघ म्हणून धारावी आगार संघास ''गणपतराव विश्वासराव फिरता चषक'' पारितोषिक देण्यात आले.

बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या क्रीडा विभागातर्फे 'कै. मधुसूदन पाटील स्मरणार्थ' ठेवण्यात आलेला फिरता चषक व कायम स्वरुपाचा चषक सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून श्री. सुरेश पाटील (वडाळा आगार) यांना श्री. रंजन चौधरी, माजी बेस्ट समिती सदस्य व श्री. बाळकृष्ण डामसे, सहाय्यक वाहतूक अधिकारी - वडाळा यांच्या शुभहस्ते देण्यात आला.

पंच सर्वश्री प्रकाश चव्हाण (राष्ट्रीय पंच), दिनेश कदम (राष्ट्रीय पंच) (बेस्ट उपक्रम), तसेच सुनिल गोरिवले, किरण नाईक, उमेश चव्हाण, जितेंद्र दळवी यांनी पंच म्हणून काम पाहिले. निवड समितीत पुढील सदस्य होते – सर्वश्री (१) पांडुरंग भोगले (बँक ऑफ महाराष्ट्र), (२) वैभव तोरस्कर (ओरिएन्टल इन्युरन्स्), (३) कृष्णा काताळे (स्टेट बँक ऑफ इंडिया), (४) नरेन्द्र तावडे (बेस्ट उपक्रम), (५) दत्ताराम पिसाळ (बेस्ट उपक्रम), (६) श्री. गणेश रेवणे (यूनियन बँक).

| क्र. | आगार | पारितोषिक | चषक |
|---|---|---|---|
| १ | बॅकबे आगार | विजेता | कै. इंदिरा शेटये चषक व मंडळाचा फिरता चषक |
| २ | वडाळा आगार (अ) | उपविजतेता | कै. शरद आचार्य फिरता चषक व मंडळाचा फिरता चषक |
| ३ | कुलाबा आगार | तिसरा क्रमांक | बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाचा फिरता चषक |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | धारावी आगार | 'शिस्तबध्द' संघ | कै. गणपतराव विश्वासराव फिरता चषक |
| ५ | श्री. राहूल परब (वडाळा) | सर्वोत्कृष्ट खेळाडू | कै. मधुसूदन पाटील स्मरणार्थ |

सर्वश्री दिनेश कदम, अजित जगदाळे, जितेंद्र दळवी, प्रकाश चव्हाण व किरण नाईक यांनी पंच म्हणून काम पाहिले.


२०२१-२२ या वर्षाकरीता निवड करण्यात आलेला बेस्टचा कबड्डी संघ पुढीलप्रमाणे–

| क्र. | सर्वश्री | क्र. | सर्वश्री | क्र. | सर्वश्री |
|---|---|---|---|---|---|
| १ | सुरेश पाटील | २ | मनोज वरळीकर | ३ | रत्नाकर पाटील |
| ४ | राहूल परब | ५ | मंगेश भिलारे | ६ | दिपक पाटील |
| ७ | विलास पाटील | ८ | मंगेश सालपेकर | ९ | राजेश बेर्डे |
| १० | जितेंद्र दळवी | ११ | अमेय म्हादे | १२ | किरण नाईक |
| १३ | हेमंत खांडेकर | १४ | विदेश वाजे | १५ | उमेश चव्हाण |
| १६ | उमेश सातार्डेकर | | | | |

प्रशिक्षक : प्रकाश महाडेश्वर

निवड समिती : १.सर्वश्री. प्रमोद पेंडुरकर, २. पांडुरंग भोगले, ३. वैभव तोरस्कर,
४. जयसिंग घुगरे, ५. नरेंद्र तावडे, ६. रघुनाथ खडके, ७. अजित जगदाळे

## टेबल टेनिस विभाग



वार्षिक अंतर्गत आगार टेबल टेनिस स्पर्धा २०२०-२०२१ :-

टेबल टेनिस विभागातर्फे वार्षिक अंतर्गत टेबल टेनिस स्पर्धा दिनांक २३ मार्च ते २५ मार्च, २०२१ या कालावधीत आणिक आगार येथे आयोजित केली होती. सदर स्पर्धा पुरुष एकेरी, महिला एकेरी व प्रौढ एकेरी अशा तीन प्रकारांमध्ये आयोजित केली होती.

स्पर्धेचा उद्घाटन सोहळा मंगळवार, दिनांक २३ मार्च, २०२१ रोजी माननीय श्री. प्रदिप कुलकर्णी - उप मुख्य अभियंता यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या प्रसंगी मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

स्पर्धेचे अंतिम सामने व पारितोषिक वितरण समारंभ गुरुवार, दिनांक २५ मार्च, २०२१ रोजी संपन्न झाला. माननीय श्री. अनिलकुमार सिंगल, मुख्य वैद्यकीय अधिकारी यांच्या हस्ते विजयी स्पर्धकांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

श्री. राजन राऊत यांनी उत्कृष्ट खेळी करुन पहिल्या फेरी पासून थेट पहिल्या आठात धडक मारली, त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे :-

१. पुरुष एकेरी -

| | | |
|---|---|---|
| १. | विजेता | श्री. नितीन वालावलकर |
| २. | उपविजेता | श्री. विनोद शुक्ला |
| ३. | तृतीय विजेता | श्री. सुजित राणे |
| ४. | चतुर्थ विजेता | श्री. सॉस्टर डिसोझा |

२. महिला एकेरी –

| | | |
|---|---|---|
| १. | विजेती | सौ. श्रावणी ढापरे |
| २. | उपविजेती | सौ. लता धुरी |
| ३. | तृतीय विजेती | सौ. संध्या खानोलकर |
| ४. | चतुर्थ विजेती | सौ. गीता बिकाळे |

३. प्रौढ एकेरी (४०+)–

| | | |
|---|---|---|
| १. | विजेता | श्री. निलेश जानवलेकर |
| २. | उपविजेता | श्री. नितेश नायक |

या स्पर्धेत प्रमुख पंच म्हणून श्री. विनोद शुक्ला यांनी तर श्री. अशोक जाधव यांनी सहपंच म्हणून काम पाहिले.

२०२१-२२ या वर्षाकरीता निवड करण्यात आलेला बेस्टचा टेबल टेनिस संघ पुढीलप्रमाणे –

| क्र. | नाव (सर्वश्री) | क्र. | नाव (सर्वश्री) | क्र. | नाव (सर्वश्री) |
|---|---|---|---|---|---|
| १ | नितीन वालावलकर | २ | विनोद शुक्ला | ३ | सुजित राणे |
| ४ | सॉस्टर डिसोझा | ५ | विभेष देसाई | ६ | राजन राऊत |
| ७ | संदिप कंक | ८ | जयवंत मोरे | ९ | निलेश होलमुखे |
| १० | संदेश गांधी | | | | |

| राखीव खेळाडू (पुरुष) | | महिला खेळाडू | | राखीव खेळाडू (महिला) | |
|---|---|---|---|---|---|
| १ | निलेश जानवलेकर | १ | श्रीमती श्रावणी ढापरे | १ | श्रीमती प्रणिता रावराणे |
| २ | विनोद मगर | २ | श्रीमती लता धुरी | | |
| | | ३ | श्रीमती संध्या खानोलकर | | |
| | | ४ | श्रीमती गिता बिकाळे | | |

निवड समितीवर श्री. विभेश देसाई, श्री. संदिप कुलकर्णी व सौ. श्रावणी ढापरे होते.

## व्हॉलीबॉल विभाग



१. आंतर आगार व्हॉलीबॉल स्पर्धा २०२०-२१

दिनांक २२ मार्च, २०२१ ते २६ मार्च, २०२१ दरम्यान वडाळा बेस्ट कर्मचारी वसाहतीतील, क्रीडांगणावर आंतर आगार व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेमध्ये १४ संघानी भाग घेतला होता.

दिनांक २२.०३.२०२१ रोजी श्री. रा. द. करे – प्रभारी कार्यकारी अभियंता (परिवहन अभियांत्रिकी) यांच्या शुभहस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. या प्रसंगी श्री. धनंजय पवार - सभापती (क्रीडा) तसेच श्री. प्रमोद यादव – सरचिटणीस (क्रीडा) उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री. भूपेंद्र नांदोस्कर यांनी केले.

दिनांक २६.०३.२०२१ रोजी पारितोषिक वितरण समारंभ पुर्वी स्पर्धेचा अंतिम सामना मजास आगार विरुध्द दादर कार्यशाळा (अ) या संघामध्ये खेळला गेला. या अटीतटीच्या सामन्यात मजास आगार संघाचा विजय झाला. या स्पर्धेमध्ये सर्वश्री. श्रीकांत वेदांते – मानद् सचिव, भूपेश गावड, मिलिंद कदम , संजय ढापरे व आर. सी. दुबे यांना उत्कृष्ट खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले.

दिनांक २६.०३.२०२१ रोजी स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ श्री. विजय कदम, हंगामी उप मुख्य व्यवस्थापक (आंतर लेखा परिक्षा विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या प्रसंगी श्री. विनायक शिंदे - सुरक्षा अधिकारी, तसेच व्हॉलीबॉल विभागाचे माजी मानद् सचिव व खेळाडू श्री. मोहन पेडणेकर, श्री. डी. एन्. कोकम उपस्थित होते. वडाळा कर्मचारी वसाहत संघटनेचे अध्यक्ष श्री. सुभाष नलावडे, सेक्रेटरी श्री. सुरेश सावंत व सचिव श्री. किशोर सावंत व क्रीडा विभागाचे इतर मानद् सचिव उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. भूपेंद्र नांदोस्कर यांनी केले. श्री. श्रीकांत वेदांते, मानद् सचिव (व्हॉलीबॉल) यांनी आभार प्रदर्शन केले.

दिनांक ३१.०३.२०२१ रोजी अंतिम संघाची निवड करण्यात आली. या संघ निवडीसाठी श्री. मोहन पेडणेकर, माजी मानद् सचिव व प्रशिक्षक यांना आमंत्रित करण्यात आले होते. संघ निवडीसाठी सर्वश्री मोहन पेडणेकर, आर. सी. दुबे, प्रकाश नायर यांनी सहकार्य केले.

२०२१-२२ या वर्षाकरीता निवड करण्यात आलेला बेस्टचा व्हॉलीबॉल संघ पुढीलप्रमाणे -

| क्र. | नाव (सर्वश्री) | क्र. | नाव (सर्वश्री) | क्र. | नाव (सर्वश्री) |
|---|---|---|---|---|---|
| १. | संजय ढापरे (कर्णधार) | २. | सुरेंद्र पटेल (उपकर्णधार) | ३. | परेश पारकर |
| ४. | मिलींद कदम | ५. | शिवकुमार गोसाईन | ६. | भूपेश गावंड |
| ७. | संदिप कोरडे | ८. | नागेश शिवगण | ९. | संदिप बेलसरे |
| १०. | निलेश महागांवकर | ११. | सुहास धुरे | १२. | ऋषीकुमार दुबे |

३

राखीव खेळाडू

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुरज गोडसे | २ | श्री. उमेश गोवारी |

सपोर्ट स्टाफ

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. ज्यो डायस | २ | श्री. अमोल देसाई |

निवड समिती : (१) सर्वश्री मोहन पेडणेकर (२) आर. सी. दुबे (३) प्रकाश नायर

## बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ

### दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचे उत्पन्न –खर्च लेखा विवरणपत्र

| २०१९-२०२० रु. पै. | खर्चाचा तपशील | २०२०-२०२१ रु. पै. | २०१९-२०२० रु. पै. | उत्पन्नाचा तपशील | २०२०-२०२१ रु. पै. |
|---|---|---|---|---|---|
| ६१७३८.०० | मैदानी खेळ | ०.०० | ७०००००.०० | बेस्ट उपक्रमाकडून अनुदान | १००००००.०० |
| १४९१२१.०० | बॅडमिंटन | ७६२४७.०० | २३८४३६०.०० | सभासद वर्गणी | २२५०९२०.०० |
| ८४४२४.०० | क्रिकेट | १३९५६३.०० | ६२०.०० | सभासद प्रवेश शुल्क | २२०.०० |
| ३९८९६.०० | फुटबॉल | १५४५२७.०० | – | बचत खात्यावरील व्याज | – |
| – | हॉकी | १४४३९०.०० | ५४५४१०.०० | मुदत ठेवीवरील व्याज | ४९९२८०.०० |
| १६४३२५.०० | बैठे खेळ | ८९६४०.०० | | -:जमा:- | |
| ९२१३.०० | कबड्डी | १०४७१९.०० | – | मैदानी खेळ | – |
| २६०७०.०० | टेबल टेनिस | १०१००६.०० | – | बॅडमिंटन | ४२२०.०० |
| – | व्हॉलीबॉल | १०४९४८.०० | – | क्रिकेट | ६७०.०० |
| १२०८८९.०२ | सर्वसाधारण (क्रीडा) | ४९४३९.५२ | २५००.०० | फूटबॉल | ८००.०० |
| ५३०५७.०२ | सर्वसाधारण (कला) | २९०७१.५२ | – | हॉकी | ४५०.०० |
| – | एकांकिका | ४३४७८.०० | ८३८०.०० | बैठे खेळ | ३६००.०० |
| – | संगीत | ४७९३९.०० | – | कबड्डी | ३२००.०० |
| – | विविध करमणूक | – | – | टेबल टेनिस | १५२०.०० |
| २०७६८२.०० | नाटय विभाग | २५७४८४.०० | – | व्हॉलीबॉल | १४००.०० |
| ८००७७.०० | ललित कला व प्रदर्शन | २९००३.०० | – | एकांकिका | – |
| ७९९४२.०० | घसारा | ७७४३९.०० | – | संगीत | – |
| ९०७६९.०० | आयकर / व्याज भरणा २०११-१२ | | – | विविध करमणूक | – |
| ८३५३८.०० | आयकर / व्याज भरणा २०१२-१३ | | २९६१०.०० | नाटय विभाग तिकीट विक्री व बक्षिसांसह | ६०००.०० |
| १५२६५६.०० | आयकर / व्याज भरणा २०१३-१४ | | | | |
| १७८५८८.०० | आयकर / व्याज भरणा २०१४-१५ | | | | |
| १८०३७८.०० | आयकर / व्याज भरणा २०१५-१६ | | | | |
| १६११२०.०० | आयकर / व्याज भरणा २०१६-१७ | | | | |
| १४४४३२.०० | आयकर / व्याज भरणा २०१७-१८ | | | | |
| १७९६७९.०० | आयकर भरणा २०१८-१९ | | | | |
| १४२३२८५.९६ | खर्चापेक्षा जास्त उत्पन्न | २३२३३८५.९६ | | | |
| ३६७०८८०.०० | एकूण | ३७७२२८०.०० | ३६७०८८०.०० | एकूण | ३७७२२८०.०० |

गणेश बांबळे — लेखा परिक्षक

प्रमोद यादव — सरचिटणीस (क्रीडा)

विजय सूर्यवंशी — सरचिटणीस (कला)

मनोज गडहिरे — मा. खजिनदार

## बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ

### दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचे ताळेबंद पत्रक

| २०१९-२०२० रु. पै. | दायित्वे | २०२०-२०२१ रु. पै. | २०१९-२०२० रु. पै. | मालमत्ता | | २०२०-२०२१ रु. पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १०७८८००८.६४ | सर्व साधारण निधी मागील ताळेबंदनुसार शिल्लक | १२२११२९४.६० | ७४१३८१.०० | कायम स्वरुपाची मालमत्ता | ७९६१८१.०० | ७१८७४२.०० |
| | | | | वजा – घसारा तरतूद १०% प्रमाणे | ७७४३९.०० | |
| १४२३२८५.९६ | अधिक : खर्चापेक्षा जास्त असलेले | २३२३३८५.९६ | | अनामत ठेवी : | | |
| – | सनदी लेखापाल मानधन | – | १५०००.०० | यशवंत नाट्य मंदीर | | १५०००.०० |
| | | | ८०००.०० | दामोदर हॉल | | ८०००.०० |
| | | | १०००.०० | महानगर टेलिफोन निगम लि. | | १०००.०० |
| | | | २३१५९७९.६० | चालू खाते | | ५०१९२९२.५६ |
| | | | ७०३६३.०० | बचत खाते | | ७०३६३.०० |
| | | | ८००००००.०० | बँक ऑफ इंडियातील मुदत ठेव | | ८००००००.०० |
| | | | ७०००००.०० | बेस्ट उपक्रम अनुदान येणे बाकी | | ०.०० |
| | | | १९३९१०.०० | सभासद वर्गणी येणे बाकी | | ३६६३२०.०० |
| | | | १२०.०० | प्रवेश शुल्क येणे बाकी | | ८०.०० |
| | | | ३०००.०० | राज्य हिंदी नाट्य - प्रवेश शुल्क परतावा येणे बाकी | | ०.०० |
| | | | ५४५४१.०० | स्त्रोतातून कर वजात-२०१९-२०२० | | ५४५४१.०० |
| | | | १०८०००.०० | आयकर भरणा २०१९-२०२० | | १२३८९६.०० |
| | | | – | स्त्रोतातून कर वजात-२०२०-२१ | | ३७४४६.०० |
| | | | – | आयकर भरणा २०२०-२०२१ | | १२००००.०० |
| १२२११२९४.६० | एकूण | १४५३४६८०.५६ | १२२११२९४.६० | एकूण | | १४५३४६८०.५६ |

| | | | |
|---|---|---|---|
| गणेश बांबळे | प्रमोद यादव | विजय सूर्यवंशी | मनोज गडहिरे |
| मा. लेखा परिक्षक | सरचिटणीस (क्रीडा) | सरचिटणीस (कला) | मा. खजिनदार |

# बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ

दुरध्वनी क्र. २२७९९४८५
किंवा २२८५६२६२
विस्तारित क्र. ४८५

बहुमजली इमारत,
७ वा मजला, बेस्ट मार्ग,
कुलाबा, मुंबई - ४००००१

संदर्भ : कला व क्रीडा/लेखा परीक्षण प्रमाणपत्र/०७८/२०२१ दिनांक: १२.११.२०२१

सभापती (कला)
बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ
मुख्य अभियंता (ग्राहकसेवा)

सभापती (क्रीडा)
बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ
विभागीय अभियंता (ग्राहक सेवा-ए-वॉर्ड)

विषय : ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचे
बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या हिशोबांचे लेखापरीक्षण.

महोदय,

दिनांक ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचे बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाचे हिशोब तपासण्यात आले व ते बरोबर आढळून आले आहेत.

मंडळाच्या खर्चाचे हिशोब योग्य रीतीने ठेवण्याकरिता २०२०-२१ या वर्षामध्ये करण्यात आलेल्या निरनिराळया सूचना, कला आणि क्रीडा मंडळाच्या व्यवस्थापन समितीने स्विकारल्या आहेत.

आपला विश्वासू,

(गणेश बाबंळे)
मानद.लेखा परीक्षक

# बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ

## :: भावपूर्ण श्रध्दांजली ::

## कै. राजेश कदम



मंडळाचे हरहुन्नरी कलाकार, दिग्दर्शक श्री. राजेश कदम यांचे दिनांक २६.०९.२०२१ रोजी दु:खद निधन झाले. नाट्य व एकांकिका विभागाच्या जडणघडणीत त्यांचे खूप योगदान आहे. अशा या कलाकारास मंडळाच्यावतीने भावपूर्ण श्रध्दांजली !